साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्षे 31 वे

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे

संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५४ | पाने-१६ | दि.१/१२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# कुकडी कालवा संपादनाचा मोबदला तातडीने द्या - शेतकरी संतप्त - कालवा बुजविण्याच्या तयारीत

करमाळा : करमाळा तालुक्यात २६ किलोमीटर अंतरावर कुकडीचे कॅनॉल तयार झाले असून, अद्याप या कॅनॉलमधून पाणी आले नाही आणि शंभर टक्के शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मोबादलाही मिळाला नाही. त्यामुळे या तालुक्यातील शेतकरी संतप्त झाले असून, पाटबंधारे विभागाने भुसंपादनाची रक्कम सर्व शेतकऱ्यांना तातडीने द्यावी अन्यथा संबंधित शेतकरी ज्याच्या त्याच्या हद्दीतील कालवे बुजविण्याच्या तयारीत आहेत.

करमाळा तालुक्यातील २४ हजार ५६२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यासाठी कुकडी डावा कालवा २२३ किलोमीटर ते २४९ किलोमीटर पर्यंत करमाळा तालुक्यात खोदण्यात आला आहे. असे असलेतरी या खोदलेल्या तलावातून एकदाही पाणी आले नाही आणि भविष्यात पाणी येण्याची शाश्वती एकाही शेतकऱ्याला राहिलेली नाही. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत.



अंजनडोह, विहाळ, उमरड, राजुरी, पुनवर, जातेगाव, कामोणे, पोथरे, मांगी, वडगाव, लिंबेवाडी, सावडी, कुरणवाडी, पोंधवडी, मांजरगाव, हुलगेवाडी, गोरेवाडी, कोर्टी, मोरवड, रोशेवाडी, जेऊरवाडी, वाशिंबे, पोफळज, वंजारवाडी, घरतवाडी, भिलारवाडी, कावळवाडी, भगतवाडी, गुलमोहरवाडी, हिंगणी, देलवडी, दिवेगव्हाण, पारेवाडी, कुंभारगाव, वीट, झरे, खडकेवाडी, कुंभेज, रावगाव, पिंपळवाडी, भोसे, हिवरवाडी, करमाळा ग्रामीण, उंदरगाव, सोगाव अशा गावातून २६ किलोमीटरचा कॅनॉल झाला आहे. प्रत्येक गावातून कमी-अधिक क्षेत्र संपादीत झाले आहे. संपादनाचा मोबदला तात्काळ द्यावा ही शेतकऱ्यांची कळकळीची विनंती आहे.

काही शेतकऱ्यांना भुसंपादनाची रक्कम मिळालेली आहे. ५० टक्के पेक्षा जास्त शेतकरी पैशाच्या प्रतिक्षेत आहेत. पाटबंधारे विभाग व भुसंपादन कार्यालय यांच्यातील असमन्वय आणि शासनाकडील पैशाची कमतरता यामुळे भुसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपापल्या हद्दीतील कॅनॉल जेसीबीद्वारे बुजवून काही ठिकाणी शेती केली आहे, काही ठिकाणी घरे बांधले आहेत. काही ठिकाणी गोठा केलेला आहे. रस्त्यालगतच्या कॅनॉलवर कॅनॉल बुजवून धाबे टाकलेले आहेत.

हे प्रमाण आता वाढत असून भुसंपादन कार्यालयाने सर्व संपादीत झालेल्या शेतकऱ्यांचा मोबदला तातडीने देण्याची गरज आहे. अन्यथा राहिलेले कॅनॉलही जमिनदोस्त झाल्याशिवाय राहणार नाहीत; असा इशारा संबंधित शेतकऱ्याच्या प्रतिनिधींनी दिला आहे.



ढीगभर आश्वासनापेक्षा कणभर मदत महत्वाची !

संपादकीय.............................................!

# दुष्काळाची पावलं..

राज्य शासनाने राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. त्यात २४ तालुक्यात गंभीर तर १४ तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केला आहे. त्यात आपल्या तालुक्याचा मध्यम स्वरूपाच्या दुष्काळात समावेश आहे. तालुक्यात सरासरी पावसाच्या तुलनेत जेव्हा २५ टक्के पेक्षा कमी व २० टक्के पेक्षा जास्त पाऊस पडतो तेंव्हा कृषी उत्पन्नावर परिणाम होतो. दुसरा निकष म्हणजे पेरणी ५० टक्केपेक्षा कमी होते त्या भागाला 'दुष्काळी भाग' म्हटले जाते. पाऊस कमी पडला की नदी, तलाव, धरणातील पाणी पातळी कमी होते. जमीनीतील ओलावा घटल्यामुळे कृषी उत्पादन घटते. दुष्काळ म्हणजे दुष्ट काळ, दु:खाचा काळ, अन्नाची कमतरता, शुध्द पाणी कमी, रोजगार कमी एवढेच नाहीतर व्यक्तींची सर्व बाबीची खरेदी करण्याची क्षमता कमी होते. करमाळा तालुक्यात दुष्काळाचा असर हळू हळू वाढणार आहे.

सध्या काही भागात प्यायचे पाणी तळाला गेले आहे. जनावरांना पाणी टंचाई जाणवू लागली आहे. जोपर्यंत साखर कारखाने चालू आहेत, तो पर्यंत जनावरांना वाढे मिळेल नंतर काय..? असे असलेतरी या तालुक्याच्या बाबतीत एक म्हणावेसे वाटते 'नशीब देते व कर्म नेते' अशी स्थिती झाली आहे. या तालुक्याला नशिबाचे वरदान खूप चांगले आहे. उत्तरेकडे सीना नदी व दक्षिणेकडे भीमा नदी आहे. विशेष म्हणजे दोन्ही नद्यावर दोन धरणे झालेली आहेत. भीमा नदीवर उजनी धरण झाले. ते पुणे व सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेले आहे. असे असलेतरी ज्यांच्या हद्दीत आहे अशा करमाळेकरांना मात्र त्याचा फारच थोडा लाभ होत आहे. पुरेसी वीज मिळत नाही, तालुक्यासाठी पाण्याचा राखीव साठा नाही. दुसऱ्या बाजूला सीना नदी असून त्यावर कोळगाव प्रकल्प उभारलेला आहे. पण त्याचाही लाभ करमाळेकरांना किती होत आहे..? या भागात पाणी असूनही वीज नसल्यामुळे पीके तर सोडा परंतू जनावरांना सुध्दा प्यायला पाणी मिळत नाही. कोळगाव प्रकल्पाचे पाणी साठवण नियोजन योग्य होत नाही. कमी पाऊस झाला की हे धरण कोरडे रहाते. तालुक्यातील ११ छोटे व मध्यम प्रकल्पाचे तलावात जवळपास तळपातळीवर पाणी आहे. मांगी तलावात जे पाणी आहे, ते किमान प्यायला पाणी म्हणून तरी साठवणे गरजेचे आहे. थोडक्यात त्यात तातडीने कुकडीतून पिण्यासाठी पाणी आणणे गरजेचे आहे.

आत्तापर्यंत तालुक्यात आदिनाथ, मकाई, भैरवनाथ, कमलाई हे चार कारखाने आहेत. त्यात मकाई सुरूच झाला नाही, आदिनाथ सुरू झाला पण ऊसाअभावी बंद आहे. भैरवनाथ व कमलाई हे कारखाने नेटाने चालवले जात असलेतरी या कारखान्यांना पुरेसा उस मिळेना; अशी स्थिती आहे.

करमाळा तालुका हा दुष्काळी तालुका म्हणून जाहीर केला आहे. दुष्काळ म्हटले, की शासन नागरीकांना रोजगार, अन्न, पिण्याला पाणी, जनावरांना चारा पुरवण्याच्या अनुषंगाने योजना राबवते व तातडीने मदतीचे नियोजन करते. या जाहीर झालेल्या दुष्काळात चारा छावणीचे नियोजन नाही, आवश्यक तिथे टँकर सुविधा देण्याचे नियोजन आहे. करमाळा शहरात अजून दुष्काळाची तीव्रता दिसत नाही; पण खेड्यात गेल्यानंतर दुष्काळाचे चटके काय असतात, हे लगेच समजतात. या दुष्काळाचा फटका पाळीव प्राण्याला बसतोच पण सर्वात जास्त वन्य प्राण्यांना मोठा फटका बसतो. अनेक प्राणी चारा व पाण्यावाचून मरतात. रोजगार हमीचे काम सन्मानपूर्वक दिले पाहिजे, तशी व्यवस्था येथे नाही. तालुक्यातील शेतकरी प्रयोगशील आहे, प्रयत्नवादी आहे. याच मेहनतीच्या जोरावर तालुक्यातील शेकडो एकरातील फळबागा शेवटच्या घटका मोजत आहे. त्यासाठी कोणतेच नियोजन नाही. अशा स्थितीत तालुक्यातील सर्वच पक्षाच्या, गटाच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी योग्य नियोजन केले पाहिजे व सर्वांना मदत केली पाहिजे. जर अशा प्रसंगी आपण आपली जबाबदारी पाळली नाहीतर आपण कोणत्या लायकीचे हे ज्याचे त्याने समजून घेतले पाहिजे. आपल्या तालुक्यात कृतीपेक्षा श्रेय लाटण्याचे मोठे युध्द कायम असते. एकमेकावर शिंतोडे उडवण्यामुळे कोणी श्रेष्ठ ठरत नाही. जो सर्वसामान्यासाठी सतत प्रयत्नशील राहतो, विशेषत: जो यशस्वी ठरतो तो जनसामान्यांच्या स्मरणात राहतो. वास्तविक पाहता 'मणभर आश्वासनापेक्षा कणभर मदत' महत्वाची असते.

तालुक्यामध्ये दुष्काळाला प्रारंभ झाला पण कोणी दुष्काळी दौरा काढला आहे का..? तसे नियोजन तरी आहे का..? ही बाब महत्वाची आहे. संकटामध्ये सर्वसामान्यांचे आश्रू पुसले पाहिजेत. पण केवळ आश्रू पुसूनच थांबून चालणार नाही तर दुष्काळाने शेतकरी दबणार नाही; यासाठी आधार देण्याची गरज आहे. या संकटात तो उभा कसा राहील, त्याच्या पायात बळ कसे येईल, त्याला जगावेसे कसे वाटेल; यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. बऱ्याचवेळा दुष्काळी दौरा काढत राजकीय गप्पा मारून समोरच्याला किळस वाटेल असे कृत्य केले जाते ते या काळात अपेक्षीत नाही. कारण आज लोकांना राजकारणात मागे काय झाले व पुढे काय करू यात रस नाही. आज तुम्ही काय केले आहे व काय करत आहात, काय मदत देणार आहात ही बाब महत्वाची आहे. आरोप-प्रत्यारोपापेक्षा ठोस व ठाम कृती व जनजागरण ही बाब महत्वाची आहे.

दुष्काळ म्हणजे कमी पाऊस पडणे नव्हे, दुष्काळ म्हणजे हलाखी, जमीनीला भेगा नव्हे, पाण्याच्या रिकाम्या हंड्याच्या रांगा नव्हे, तर सर्वांनाच आज समजावून सांगायला हवे.. "बाबा दुष्काळ हा पाण्याचा गैरवापर व त्यातून निर्माण झालेली चणचण आहे. आपल्याकडे जेंव्हा पाणी होते तेंव्हा व आजही आहे त्याचे योग्य नियोजन करत नाही. पाण्याचा अपव्यय करतो त्याचे फळ म्हणजे दुष्काळ आहे." जमीनीवरून पाणी देणे, ऊसाचे कटच्या कट अंदाजाने भिजवणे, पीकांना बेसुमार पाणी देणे ही दुष्काळाच्या आमंत्रणाची कारणं आहेत. पाण्याचे संरक्षण कधी केलेच नाही. पैशाची साठवण करतो, धान्यांची साठवण करतो, कडब्याच्या गंजी साठवतो पण पाण्याची बँक कोठे आहे ? शेततळी केली पण त्यात पाणी साठवून ठेवले नाही. पाझर तलाव केले पण त्यात पाणी साठवून दिले नाही. मोठ मोठे तलाव केले पण त्यातच सिमेंट बंधारे, नालाबंडींग केले. तलावात पाणी येण्याचे मार्ग आडवले. जे पाणी आडले ते भरमसाठ उपसले व वारेमाप उडवले. कमी पाण्याच्या पीकाचा कधी विचार केला नाही. विज्ञानाचा पाणी साठवण्यासाठी जो उपयोग व्हायला पाहिजे तसा उपयोग झाला नाही. पाणी पुर्नभरणाचे प्रयोग, विहीर, बोअर पुर्नभरण करण्यावर कोणी भर दिला नाही. पाणी कमी पडले की घे बोअर ! साडे-घोटी येथे जमीनीची बोअर घेऊन चाळण केली आहे. या दोन गावात दहा हजार बोअर आहेत. सर्वात खोल बोअर घेतले पण जमीनीत पाणी साठवण्यासाठी प्रयोग केले नाहीत. निसर्ग कसा साथ देणार..?

आज इंधनाच्या, मोबाईल चार्जेसच्या किंमती वाढत आहेत. पेट्रोल, डिझेल, मोबाईल याची बचत कशी करता येईल. अनावश्यक वापर होणार नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आजही फटाके फुटले जातात, मोठमोठे लग्न समारंभ, अनावश्यक जेवणावळी, मद्यपार्ट्या, नको त्या देवाला बोकड कापण्याचे प्रकार होतात. निदान या दुष्काळात तरी या बाबीला फाटा देण्याची गरज आहे. दुष्काळ हे संकट आहे, पण या संकटातूनच माणूस उभा राहायला शिकतो. १९७२ च्या दुष्काळानंतर अन्नधान्य कसे वाढवावे हे आपला शेतकरी शिकला. त्यातून प्रचंड अन्नधान्य निर्माण झाले. आज अन्नांचा प्रश्न नाही, प्रश्न फक्त पाण्याचा आहे. त्यामुळे या दुष्काळातून भविष्यात पाणी कमी पडणार नाही अशा योजना केल्या पाहिजेत. रोजगार हमीतून जिथे जिथे पाणी साठले जाईल; अशी ठिकाणे असतील त्या शेतकऱ्याच्या शेतात जलसंधारणाची कामे सुरू केली पाहिजेत. पुर्वीच्या जलसंधारण कामात ज्या त्रुटी राहिल्या आहेत, त्या त्रुटी पुर्ण केल्या पाहिजेत. तालुक्यात हजारो नालाबंडींग व पाझर तलाव आहेत परंतू त्यात त्रुटी आहेत. कोठे सांडवा नाही, कोठे बांध पुर्ण नाही, कोठे भराव फुटला आहे. अपुरे सिमेंट बंधारे, फुटलेले सिमेंट बंधारे अशा कामात पैसे गेले. पण काम अपुर्ण असल्यामुळे त्याचा फायदा काहीच झाला नाही. पुर्वीची कामे परिपुर्ण केलीतर भविष्यात दुष्काळावर नक्की मात करू शकू.

आज दुष्काळातही जो भ्रष्टाचार करत असेल त्यांच्यावर लक्ष ठेवण्याची गरज आहे. मटका, जुगार, एन्ट्री पुर्णपणे बंद केले पाहिजे. साध्या साध्या कामात सर्वसामान्याकडून लाच घेऊन त्यांना त्रस्त करणे थांबवले पाहिजे. मध्यंतरी चारा डेपो कंत्राटदारांनी शासनाकडून सात रूपये किलो प्रमाणे ठेका घेतला व चारा शेतकऱ्याकडून जास्तीत जास्त तीन रूपये किलो घेतला. एका किलोला चार रूपये नफा ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. या सर्व बाबी सर्वांनी नीट पाहिल्या पाहिजेत, तरच या कठीण प्रसंगावर आपण मात करू शकू...!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)




## करमाळा शहरामध्ये

२५ एकरांमध्ये निर्माण होत असलेला अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असा NA ओपन प्लॉटसचा प्रकल्प !

### आजची खरेदी उद्याचं भविष्य समृद्ध करेल.

# दिव्यरत्न सिटी

### ७०० स्क्वे फुटांपासून ते १५०० स्क्वे फुटांचे प्लॉटस उपलब्ध

- वास्तुशास्त्रानुसार प्लॉट्स
- वॉल कंपाऊंड
- स्वतंत्र डि. पी. व्यवस्था तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला पोल व स्ट्रीटलाईट सह
- अंतर्गत ३० फुटी व ४० फुटी रस्ते
- पाईपलाइन व्यवस्था
- अद्ययावत ड्रेनेज सिस्टीम
- लहान मुलांसाठी खेळण्याचे मैदान
- जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कट्टा
- प्रशस्त बाग आणि वृक्षरोपणासाठी जागा
- रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुतर्फी अतिशय सुंदर झाडी

**करमाळ्याच्या नगरपालिका हद्दीत NA मंजूर ले आउट, स्वतंत्र सिटीसर्व्हे उतारा व नकाशासह नगरपालिकेचे सुद्धा उतारा व N. A. ऑर्डर्ससह उपलब्ध.**

**अधिक माहितीसाठी संपर्क 7887 55 7771 / 9765 05 4415**

# दूध प्रकल्प चालवणाऱ्या उद्योगपतींची ईडीमार्फत चौकशी करा : महेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : दूध विक्रीतून येणाऱ्या पैशातून ७० टक्के वाटा शेतकऱ्यांना द्यावा व ३० टक्के वाटा दूध प्रकल्पांनी घ्यावा; असा आदेश राज्य शासनाने काढलेला असताना, दूध प्रकल्प दूध उत्पादकांना केवळ ५० टक्के दर देत आहेत. शेतकऱ्यांचा पैसा लुटून अल्पकाळात अब्जावधी रूपयांची प्रॉपर्टी निर्माण करणाऱ्या सर्व दूध प्रकल्प चालवणाऱ्या उद्योगपतींची ईडीमार्फत चौकशी करा; अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केली आहे.

सध्या महाराष्ट्रात दूध प्रकल्प चालवणाऱ्या उद्योगपतींची युती झाली असून सर्व उद्योगपती ठरवून शेतकऱ्यांच्या दुधाला २६ ते २७ रुपये लिटरप्रमाणे दर देत आहेत. बाजारात पिशव्यांमधून ६० रू. लिटर दराने दूध विकत आहेत. दूध पावडर दर कमी झाले, असा कांगावा करून अत्यल्प दरात दूध खरेदी करतात. त्यापासून निर्माण झालेली पावडर गोडावूनमध्ये साठा करून नंतर ही दूध पावडर दुप्पट दराने विकून करोडो रुपये आजपर्यंत कमावले आहेत. दूध दरावर शासनाचा अंकुश असताना सुध्दा हे दूध माफिया शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहेत. दूधापासून निर्माण होणारे बटर, तुप, लस्सी, श्रीकंड, खवा, पेढा या दरात एक रूपयाही दर कमी झालेला नाही. रोज दैनंदिन १५ लाख, २० लाख लिटर दूध संकलन करणारे प्रकल्प चालक दुध उत्पादक शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम करत आहेत. या प्रकल्प चालकांमुळे राज्य सरकारही बदनाम होत आहे. कर्नाटक व आंध्र प्रदेशमधील दूध प्रकल्प चालक महाराष्ट्रातील ३४ रू. लिटरने दूध खरेदी करत आहेत. जास्त खर्च असताना सुध्दा बाहेर राज्यातील प्रकल्प चालक जास्त दराने दूध महाराष्ट्रातून घेऊन जातात. केंद्र सरकारची मदर डेअरी सुध्दा या प्रकल्प चालकाकडून ३४ रुपये लिटरने दूध खरेदी करते.

राज्यातील दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आला असून, प्रति लिटर पाच रुपये दराने दूध उत्पादकांना अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करावे; अशी मागणी जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केली आहे.

# जेऊरच्या उपसरपंच पदी नागेश झांजुर्णे यांची बिनविरोध निवड



करमाळा(सं.प्र.) : जेऊर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी नागेश झांजुर्णे यांची बिनविरोध निवड झाली आहे. जेऊर ग्रामपंचायत कार्यालयात ही निवड प्रक्रिया पार पडली. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत जेऊर ग्रामपंचायतीवर पाटील गटाची एकहाती सत्ता आली आहे. सरपंच पदासह पाटील गटाने सर्वच्या सर्व १५ जागा जिंकल्या आहेत. सरपंच पदी युवा नेते पृथ्वीराज पाटील हे निवडून आले होते. प्रभाग एक मधून निवडून आलेले नागेश झांजुर्णे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. प्रभारी गटविकास अधिकारी डी.आर.सारंगकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. झांजुर्णे हे दोन वेळा जेऊर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत निवडून आले असून, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे चेअरमन आहेत. त्यांच्या निवडी-बद्दल माजी आमदार नारायण पाटील, माजी सभापती अतुल पाटील, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.अर्जुन सरक, पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर, माजी सरपंच भास्कर कांडेकर, राजुशेठ गादीया, सरपंच पृथ्वीराज पाटील यांनी अभिनंदन केले. या निवडीप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य धनंजय शिरस्कर, उषा गरड, सागर भगत, शुभम कोठावळे, शिवांजली कर्णवर, उमेश मोहिते, शबाना पठाण, मालन निमगिरे, ओंकार खांडेकर आदी उपस्थित होते.

## नागेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली

# संविधान दिनी तहसील कचेरीवर संविधान बचाव मोर्चा



करमाळा(सं.प्र.) : जिंदाबादच्या घोषणा देत, करमाळा येथे तहसील कचेरीवर संविधान दिनी नागेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली संविधान बचाव मोर्चा काढण्यात आला. शहरातील प्रमुख रस्त्यावरून सर्व महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत हा मोर्चा तहसील कचेरीवर पोहोचल्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना नागेश कांबळे म्हणाले, की राज्यघटनेत ओबीसी व मराठा आरक्षणाची तरतूद आहे. परंतु काही शक्ती जाणूनबुजून मराठा व ओबीसी बांधवात भांडण लावत आहेत. भारतीय राज्यघटना सर्वसामान्यांचे हित साधणारी आहे. काहींना ही राज्यघटनाच बदलावयाची आहे. मात्र आम्ही हे होऊ देणार नाही. यावेळी धनगर समाज आरक्षण कृती समिती, मुस्लिम समाज, संभाजी ब्रिगेड, नाभिक समाज, वैदू समाज, भारत मुक्ती मोर्चा, ओबीसी संघटना, मातंग एकता आंदोलन या संघटनांनी पाठींबा व उपस्थिती दर्शवली.

यावेळी विलासराव घुमरे, अल्ताफ कुरेशी, नितीन खटके, उद्योगपती साटपे, शिवाजी शिंदे, शिवाजी बंडगर, दिपक शेलार, प्रज्ञा कांबळे, आर.आर.पाटील, भीमराव कांबळे, दिपक ओहोळ, लक्ष्मण भोसले, प्रफुल्ल दामोदरे, उत्तम नवघरे, भास्कर भैलुमे, विकी सदाफुले यांची भाषणे झाली. मोर्चा यशस्वी करण्यासाठी मयुर कांबळे, आकाश गायकवाड प्रसन्नजीत कांबळे, विजय वाघमारे, शिवाजी शिंदे, किशोर कांबळे, रणजित कांबळे, दत्ता बडेकर, नंदू कांबळे यांनी परिश्रम घेतले.

## सिटी सर्व्हेकडून सर्वसामान्य नागरीकांना गैरवागणूक

# कामकाजात सुधारणा न झाल्यास कार्यालयास टाळे ठोकणार : सुजय जगताप

करमाळा(सं.प्र.) : येत्या आठ दिवसात जर सिटी सर्व्हेच्या कार्यालयाच्या कामकाजामध्ये सुधारणा झाली नाहीतर कार्यालयास टाळे ठोकणार; असा इशारा युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सुजय जगताप यांनी दिला

काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यातून सर्वसामान्य लोक कामासाठी सिटी सर्व्हे ऑफिसला आल्यानंतर त्यांना गैरवागणूक दिली जाते. एका कामासाठी १५-१५ हेलपाटे मारले तरी काम होत नाही. अधिकारी, कर्मचारी सतत गैरहजर असतात. त्या ऑफिसला कोणी वालीच राहिला नाही. अशी परिस्थिती गत दोन वर्षापासून आहे. काही काही व्यक्ती दोन-दोन वर्ष हेलपाटे मारून त्यांची कामे मार्गी लागली नाहीत. येत्या आठवड्यात जर यात सुधारणा झाली नाहीतर आम्ही पक्षाचे सर्व कार्यकर्ते सिटी सर्व्हेच्या ऑफिसला टाळे ठोकल्याशिवाय राहणार नाही;




असाही इशारा श्री.जगताप यांनी दिला आहे. यावेळी काँग्रेस किसान सेलचे तालुका अध्यक्ष दादासाहेब कुदळे, कुगावचे सरपंच सागर पोरे, सचिन जैनूद्दीन शेख, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष दस्तगीर पठाण, अशोक शिंदे, राजेंद्र कुंभार, छगन मोहोळकर, गणेश फलफले, नितीन चोपडे, प्रतिक जगताप बबलू चिंचकर, योगेश राखुंडे, किरण साळुंखे, बालाजी स्वामी, विकी महानवर उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# करमाळा तालुक्यात प्रथमच जि.प.शाळेतील सातवीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा व वर्गशिक्षकांचा कृतज्ञता सत्कार कार्यक्रम संपन्न



करमाळा(सं.प्र.) : तब्बल १८ वर्षानंतर प्रथमच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोथरे येथील सन २००५-०६ च्या सातवीच्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी करमाळा येथील यशकल्याणी सेवाभावी संस्थेमध्ये वर्गशिक्षक व मुख्याध्यापक यांचा कृतज्ञता सत्कार व स्नेहमेळावा कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ महिला कुसूमबाई हरिश्चंद्र पेठकर उपस्थित होत्या.

सन २००५-०६ साली पोथरे जिल्हापरिषद शाळेतील सातवीत असणारे सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी पुणे, मुंबई, श्रीरामपूर, संभाजीनगर अशा विविध ठिकाणाहून आले होते. कार्यक्रमाची सुरूवात रूपाली गोसावी हिच्या ईशस्तवनाने झाली. वर्षा पाटील हिच्या बहारदार, ओघवत्या चारोळ्यांनी भरलेल्या सुत्रसंचलनाने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

यावेळी बोलताना करे-पाटील म्हणाले, की करमाळा शहरात प्रथमच जिल्हापरिषद शाळेतील माजी विद्यार्थ्यांकडून वर्गशिक्षकांचा कृतज्ञता सत्कार व स्नेहमेळावा कार्यक्रम होत आहे. वर्गशिक्षिका मनिषा पेठकर (बाभळे), माजी मुख्याध्यापक सुधीर बाभळे, वर्गशिक्षक रविंद्र उबाळे यांनी आदर्श विद्यार्थी घडवण्या बरोबरच आदर्श नागरीक घडवले आहेत; हा करमाळा शहराचा अभिमान आहे.

विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतात वर्गशिक्षिका मनिषा पेटकर यांनी शिक्षणाबरोबरच समाजात वावरताना कसे वागावे, एकाचवेळी अनेक गोष्टी उत्कृष्टपणे कशा कराव्यात तसेच टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, कोणत्याही संकटाला न डगमगता (तरी बरं) या वाक्याचे संस्कार आमच्यावर केल्यामुळे शिक्षणाबरोबरच संसारात येणाऱ्या अडचणींवर आम्ही सहज मात करू शकलो. तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केल्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडले; असे मत मांडले. उबाळे यांनी वक्तशीरपणा, टापटीपणा, शिष्यवृत्ती मार्गदर्शन याचे चांगले संस्कार केले. त्याचा आमच्या भविष्यातही उपयोग झाला. मुख्याध्यापक सुधीर बाभळे यांनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने वागवावे व सहकार्य करावे. स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात पुढे न्यावे याचे उदाहरण स्वत:च्या कृतीतून दाखवून दिले. त्यामुळे आम्ही यशस्वी होवू शकलो

सत्काराला उत्तर देताना मनिषा पेटकर यांनी मला मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्कारापेक्षा सुध्दा जास्त विद्यार्थ्यांनी केलेला सन्मान हा माझ्या आयुष्यातील सर्वोच्च पुरस्कार आहे; असे मत व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षक व मुख्याध्यापक यांचा गणपती फोटो, शाल, श्रीफळ व बुके देऊन सन्मान केला. सर्व विद्यार्थ्यांना श्री व सौ.बाभळे यांनी सुंदर व आकर्षक अशी कुंडी सहीत गुलाबाची रोपे भेट दिली. कार्यक्रमात मनोरंजनासाठी पेटकर मॅडम यांनी तुझ्या गळा माझ्या गळा हा नाविण्यपूर्ण खेळ, लिंबू चमचा, संगीत खुर्ची असे विविध खेळ घेतले. यशस्वी विद्यार्थ्यांना पेन बक्षीस देण्यात आले. सर्व कार्यक्रमाचे नियोजन अस्लम शेख, रूपाली गोसावी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अक्षय शिंदे, शरद शिरगिरे, निलेश रंदवे, चंद्रकांत आमटे, हर्षद वाळुंजकर, दयानंद झिंजाडे, पानाचंद झिंजाडे, राम अधोरे, अशोक मोरे, चक्रधर नंदरगे, वर्षा पाटील, रेश्मा लोकरे, रूपाली गोसावी, अस्लम शेख, दिपाली ठोंबरे, पुजा शिंदे, रेणुका चिटणीस, सोनाली झिंजाडे, सुवर्णा झिंजाडे, लंका रणवरे, उर्मिला पाडुळे, छकुली झिंजाडे यांनी परिश्रम घेतले.

# नम्रता रणसिंग हिची पिंपरी-चिंचवड येथे सोशल वर्क ऑफिसरपदी निवड



करमाळा (सं.प्र): पिंपरी-चिंचवड भरती-२०२३ साठी मे २०२३ मध्ये परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये सोशल वर्क ऑफिसर पदासाठी १४०० फॉर्म आले होते. त्यापैकी ९५० उमेदवार परीक्षेसाठी उपस्थित होते. सदर पदासाठी दोन जागा राखीव होत्या. त्यापैकी एक जागा महिला उमेदवारासाठी होती. त्यामध्ये १४४ गुण मिळवून नम्रता रणसिंग यांची या पदासाठी निवड झाली आहे. सदर परीक्षेसाठी ऑगस्ट मध्ये कागदपत्र पडताळणी झाली होती व अंतिम निकाल १ डिसेंबर २०२३ ला जाहीर झाला. नम्रता ही सोलापूर जिल्हा बँकेचे ऑफिसर राजेंद्र रणसिंग यांची कन्या आहे.

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना
उपलब्ध सुविधा...
● इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
● डिजीटल एक्स-रे
● अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
● वेदनारहित दात व दाढ काढणे
● पडलेले दात बसविणे
● दात साफ करणे
● दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे
उपलब्ध सुविधा...
● स्क्रूच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
● अक्कलदाढ काढणे
● वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
● अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
● हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
● कॉस्मेटिक ट्रिटमेंट
● कर्करोगाचे निदान
● गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी



डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)
महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# तालुक्यात रोजगार हमीची कामे व पाण्याचे टँकर चालू करावेत : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील अनेक गावात पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे तालुक्यात शासनाने रोजगार हमीची कामे व पिण्याच्या पाण्याचे टँकर चालू करावेत; अशी मागणी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात गणेश चिवटे यांनी म्हटले आहे, की करमाळा तालुका शासनाने दुष्काळग्रस्त जाहीर केला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचा खरीप हंगाम अपुऱ्या पावसाने पूर्णत: वाया गेला आहे. तसेच पाऊसच न पडल्याने रब्बी हंगामही पेरविना गेला आहे. त्यामुळे गावागावात पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. या बाबीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तालुक्यात रोजगार हमीच्या कामासह पिण्याच्या पाण्याचे टँकर चालू करावेत; असेही चिवटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# उजनी प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या ३० गावांच्या समस्याबाबत ४ डिसेंबरला आढावा बैठक

करमाळा(सं.प्र.) : उजनी धरणाच्या बांधकामानंतर करमाळा तालुक्यातील ३० गावे पुनर्वसित झालेली आहेत. या गावांसाठी राज्य शासनाच्या पुनर्वसन विभागाकडून १८ नागरी सुविधांचे लाभ मिळणे आवश्यक होते. त्यापैकी अनेक गावांमध्ये अद्यापही हे लाभ मिळालेले नाहीत. या गावांच्या समस्यांबाबत ४ डिसेंबर रोजी सायंकाळी चार वाजता पंचायत समिती सभागृहात जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष बैठक बोलावली आहे; अशी माहिती आ.संजयमामा शिंदे यांनी दिली.

सदर बैठक २० ऑक्टोबर रोजी होणार होती, परंतू ग्रामपंचायत अचार-संहितेमुळे ही बैठक स्थगित करण्यात आलेली होती. ती बैठक आता होणार असल्यामुळे पुनर्वसित गावांच्या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. याविषयी अधिक माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की जानेवारी २०२३ मध्ये आपण करमाळा तालुक्यात गावभेट दौरा आयोजित केलेला होता. या गावभेट दौऱ्यात प्रत्येक गावातून आलेल्या समस्यांची नोंदणी केली गेली होती. विशेषत: उजनी धरण झाल्यानंतर तालुक्यातील पुनर्वसित गावांच्या अनेक समस्या लोकांनी मांडल्या. या समस्या सोडवण्यासाठी पुनर्वसन विभागाकडे आपण जून २०२३ मध्ये पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार सदर बैठक बोलावली आहे. या बैठकीला वांगी नं.१, वांगी नं.२, वांगी नं.३ व वांगी नं.४, भिवरवाडी, दहिगाव, बिटरगाव, कुगाव, चिखलठाण नं.१, चिखलठाण नं.२, ढोकरी, पारेवाडी, केत्तूर नं.१ व केत्तूर नं.२, सोगाव पूर्व व पश्चिम, उंदरगाव, गोरेगाव, रिटेवाडी, कविटगाव, सांगवी क्र.१ व २, कात्रज, कंदर, पोमलवाडी, खातगाव नं.१ व २, नेमतवाडी, टाकळी, कोंढारचिंचोली आदी गावातील नागरीकांनी आपल्या समस्यांसह बैठकीला उपस्थित रहावे; असे आवाहन केले.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.


करमाळा शहरात नव्याने सुरू झालेले सर्व सुविधायुक्त असे..
धर्मसंगीत
लॉन्स मंगल कार्यालय
बुकींग सुरू आहे
आपल्या करमाळा तालुक्यातील सर्वात भव्य लॉन्स मंगल कार्यालय करमाळा शहरापासून १ कि.मी. अंतरावर नागनाथ मंदिराजवळ, करमाळा-कर्जत रोडवर सर्व सोयीसुविधायुक्त प्रशस्त लॉन्स, लग्न हॉल जेवण हॉल, किचन, प्रशस्त पार्किंग इ.
टीप : पॅकेज व्यवस्था देखील उपलब्ध असणार आहे.
उपलब्ध सुविधा
● एक हजार खुर्च्या, शंभर टेबल (लोखंडी)
● सहा रूम वधू-वर सह
● स्वयंपाक व जेवणाची भांडी
● ३५ केव्ही जनरेटर व साऊंड सिस्टीम
● वाय-फाय सुविधा
● सर्वत्र सीसीटीव्ही निगराणी
● मंगल कार्यालयाचे लॉन्स एन्ट्रीला भव्य रोमन थीम डेकोरेशन सेट संपूर्ण लाईटींगसह
संपर्क : आबासाहेब आवटे परिवार (8888832011 / 9822600663 )


देशाचे नेते
मा.शरद पवार साहेब
प्रदेशाध्यक्ष
मा.जयंत पाटील
खासदार
सौ.सुप्रियाताई सुळे
आमदार
मा.रोहित पवार
प्रदेशाध्यक्ष
सुर्यकांत गवळी
(राष्ट्रवादी ग्राहक चळवळ)
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी
मा.काकासाहेब साठे
(माजी मंत्री)
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ग्राहक सरंक्षण मंच महाराष्ट्र राज्य च्या सरचिटणीस पदी
प्रा.ॲड.गोवर्धन चवरे-पाटील
यांची निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन !
जिल्हा सरचिटणीस
राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी
सौ.विजयमाला गोवर्धन चवरे-पाटील
चि.शंभुराजे चवरे-पाटील
चि.राणा कृष्णा बागल
शुभेच्छुक
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
करमाळा, माढा तालुका

## सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षातील
# जगताप विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन संपन्न




करमाळा(सं.प्र.) : येथील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षातील दहावी (अ,ब आणि क) च्या वर्गातील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले. या कार्यक्रमात ३२ विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि आजी-माजी ३० शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. ३० वर्षांनी सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी एकत्र आल्याने आणि ज्यांनी आपल्याला विद्यार्थीदशेत असताना शिकवण दिली व मार्गदर्शन केले असे गुरूजन समोर आल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सुरूवातीला गुरूजन व माजी विद्यार्थ्यांचे दिमाखदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर सर्वांचे मराठी फेटा बांधून एकत्रित छायाचित्र घेण्यात आले. शाळा तसेच समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो, या उद्देशाने शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या स्नेहसंमेलनास आलेले माजी विद्यार्थी हे आपापल्या जीवनात स्थिरस्थावर असून चांगल्या पदावर कार्यरत आहेत. त्यातील काहींनी संशोधक, इंजिनिअर, पोलीस, शिक्षक, शिक्षिका, रेल्वे कर्मचारी, गृहिणी, व्यापारी व उद्योगपती म्हणून कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. उपस्थित सर्व शिक्षकांचे सत्कार उपस्थित सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय सांगून मनोगत व्यक्त केले. यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि सगळे गतकालीन आठवणीत हरवून गेले. या कार्यक्रम प्रसंगी माजी मुख्याध्यापक गुलाबराव बागल, कवडे, बोबे, वीर, काटूळे, जाधवर तसेच सध्या शाळेवर शिक्षक म्हणून कार्यत असणारे भस्मे, अंकुशखाने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ माजी शिक्षक फंड सर व इंगळे सर देखील आवर्जुन उपस्थित होते. याप्रसंगी अभियंता व संशोधक सत्यशोधन पाटील यांचा मेडिकल क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भरीव कामगिरी केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अभियंता शितल गांधी, शिक्षक व प्रभारी केंद्रप्रमुख राहिलेले संतोष पोतदार तसेच कार्यक्रमाचे नियोजनात महत्वाची भुमिका पार पाडल्याबद्दल सुषमा ओहोळ-कांबळे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थीनी व सध्या शिक्षिका असलेल्या सारिका बोबे-मुसळे यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. सुत्रसंचालन सत्यशोधन पाटील व सुजाता पवार-भोरे यांनी केले. संतोष पोतदार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुषमा ओहोळ-कांबळे, जीवन बरीदे, योगेश चुंबळकर, संतोष पांडकर, अमजद शेख तसेच सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महादेव कदम, किरण शिंदे, सुनिल जाधव, चक्रधर वारे, दिलीप जाधव, संतोष गायकवाड, महादेव लोंढे, वैजयंती पवार-भोसले, सीमा डवरे-भुसारे, स्वाती केसकर, योगिता इंगळे-व्हटकर, शुभांगी शिंदे-बोराटे, अलका शेगडे-ढेरे, अरिफा मुलाणी-बेग आदी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आ.संजयमामा शिंदे यांचेकडून संबंधित अधिकाऱ्यांना
# दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना



करमाळा(सं.प्र.) : दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन उपाय योजना करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत. ज्या गावांनी टँकरची मागणी केली आहे, त्यांचे प्रस्ताव तात्काळ मंजूर केले जातील. याशिवाय दुष्काळी नियोजन, चारा उपलब्धतेसाठी आणि लोकांच्या हाताला काम मिळावे म्हणून नियोजन करण्यासाठीच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत; अशी माहिती आमदार शिंदे यांनी दिली.

> करमाळा तालुक्यात १७ हजाराच्या आसपास कुणबीच्या नोंदी सापडल्या आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या, त्यांना योग्य पध्दतीने कुणबीचे दाखले देण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय तालुक्यातील कारखान्यांची थकलेली ऊसबिले शेतकऱ्यांना मिळावीत यासाठी आपण जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहोत.
>
> **...संजयमामा शिंदे (आमदार)**

करमाळा तहसील कार्यालयास गेल्या सात महिन्यापासून तहसीलदार नसल्याने नागरीकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आ.शिंदे यांनी तहसील कार्यालयातील कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी प्रभारी तहसीलदार विजयकुमार जाधव, तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे, नायब तहसीलदार एस.एम.काझी, सरपंच तानाजी झोळ, ॲड.राहुल सावंत, सुजित बागल, सुरज ढेरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आ.शिंदे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. यावेळी कुणबी मराठा दाखले, रेशनकार्ड, वारस नोंदी लावणे, खातेफोड करण्यासाठी होणारी पैशाची मागणी, रस्ता प्रकरणी लांबलेल्या तारखा इ.वर चर्चा झाली.

## ता.सहकक्षप्रमुख शिवकुमार चिवटे यांच्या पाठपुराव्यामुळे
# दोन रूग्णांना मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीतून आर्थिक मदत

करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाचे तालुका सहकक्षप्रमुख शिवकुमार चिवटे यांच्या पाठपुराव्यामुळे शेवगाव (जि.अ.नगर) व मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील रूग्णांना मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीतून १ लाख ५० हजार रूपयाची आर्थिक मदत मिळाली आहे.

शेवगाव येथील नानासाहेब जायभाये यांना कॅन्सर वरील उपचारासाठी पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. उपचाराचा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेर होता. त्यांचे मित्र व चिवटे परिवाराचे स्नेही प्रा.मंगेश शेटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकिय सहायता निधीतून आर्थिक मदत मिळण्यासाठी शिवकुमार चिवटे यांना सांगितले. चिवटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यक रविंद्र ननवरे यांच्याकडून पाठपुरावा करून जायभाये यांना ५० हजाराची आर्थिक मदत मिळवून दिली. तसेच मंगळवेढा येथील शोभा बाळासाहेब कोंडूभैरू या श्रीराम हार्ट केअर हॉस्पिटल सोलापूर येथे काही दिवसांपासून हृदयरोगावरील उपचारासाठी दाखल होत्या. घरची परिस्थिती साधारण असल्याने हॉस्पिटलचा खर्च त्यांच्या अवाक्याबाहेर होता. त्यामुळे त्यांना आर्थिक मदतीची अत्यंत गरज होती. अशा परिस्थितीत त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्याच गावातील चिवटे परिवाराचे नातेवाईक गणेश सोमनाथ वठारे यांना सदरील बाब सांगितली. त्यानंतर वठारे यांनी शिवकुमार चिवटे यांच्या संपर्क साधून वैद्यकिय मदत कक्षाकडून अर्जाद्वारे आर्थिक मदतीची मागणी केली. त्यानंतर चिवटे यांनी पाठपुरावा करून शोभा कोंडूभैरू यांना एक लाखाची आर्थिक मदत मिळाली. दोन रूग्णांना मदत मिळण्याकामी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, करमाळा तालुका शिवसेना वैद्यकिय कक्षप्रमुख दिपक पाटणे यांचे विशेष सहकार्य लाभले. जायभाये व कौंडूभैरू परिवाराने आर्थिक मदत मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.डॉ.श्रीकांत शिंदे, मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यक रविंद्र ननावरे, राहुल भालेराव, अरविंद मांडवकर, ता.सहकक्ष प्रमुख शिवकुमार चिवटे यांचे आभार मानले.


**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
**होलसेल साडी डेपो**



सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळीनिमित्त खास ऑफर...
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील


देशभक्त
युवा नेते
मा.नगराध्यक्ष
2 डिसेंबर
मा.उपनगराध्यक्ष
भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक
व जगताप गटाचे युवा नेते
मा.आमदार
मा.श्री.
शंभुराजे जगताप
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
प्राचार्य
श्री.पी.ए.कापले
उपप्राचार्य
श्री.ए.एच.बागवान
पर्यवेक्षक
श्री.बी.के.पाटील
पर्यवेक्षिका
सौ.सुनिता नवले मॅडम
उच्च माध्य.विभागप्रमुख
श्री.व्ही.एल.पवार
शुभेच्छुक
महात्मा गांधी माध्य., उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला, करमाळा.
सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी


७ वे
दि.४/१२/२०२३
पुण्यस्मरण
मायेची गेली सावली
करूणेचा हरवला सागर
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येथे 'वसंत'
क्षणाक्षणाला..!
७ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त
आपल्या पवित्र स्मृतीस..
भावपूर्ण
आदरांजली
स्व.सोमनाथ उर्फ वसंत दत्तात्रय देवडीकर
(जन्म दि.२६/५/१९५८, मृत्यू दि.४/१२/२०१६)
(सेवानिवृत्त बँक ऑफिसर, दि करमाळा अर्बन बँक)
अभिवादक
श्री.मुकूंद दत्तात्रय देवडीकर व परिवार, करमाळा.

# श्री कमलादेवीची यात्रा उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री कमलादेवीची यात्रा उत्साही व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. कमलादेवीची यात्रा २३ नोव्हेंबर पासून सुरू झाली होती. मुख्य यात्रा ३० नोव्हेंबरला होती. याच दिवशी पाच वाहनातून छबिना मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. करमाळा तालुका दुष्काळाच्या छायेत ओढावलेला असताना आई कमलादेवीचा छबिना निघता क्षणी वरूण राजाने पूर्ण तालुक्यावर कृपादृष्टी दाखवली आणि संततधार पावसाला सुरूवात झाली. आई कमलादेवीचा एक वेगळा आगळा आशिर्वाद तालुक्याला मिळाला. पावसात देखील अतिशय मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने आई कमलादेवीचा छबिना मिरवणूक उत्साहात निघाला होता. रात्री तीन वाजता खंडोबा मंदिरामध्ये भाऊ-बहिणीच्या भेटीचा कार्यक्रम होऊन साडीचोळीचा आहेर मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला. श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे आणि सचिव अनिलप ाटील, विश्वस्त डॉ.प्रदीपकुमार पाटील, डॉ.महेंद्र नगरे, ॲड.शिरीष लोणकर, राजेंद्र वाशिंबेकर, सुशिल राठोड तसेच श्री कमलादेवी मंदिर पुजारी, पुरोहित, मानकरी, सेवेकरी व श्रीदेवीचामाळ येथील सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. हा यात्रा उत्सव यशस्वी पार पाडण्याकामी यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र बिडवे, उपाध्यक्ष प्रविण हिरगुडे, खजिनदार प्रभाकर सोरटे, सचिव अनिल पवार, मिरवणूक प्रमुख श्रीकांत चव्हाण, तंटामुक्त समिती अध्यक्ष सचिन चोरमले तसेच राजेरावरंभा तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# बारामती ते परांडा महामार्ग तयार करण्यात यावा : नागरीकांची मागणी

करमाळा(सं.प्र.): पश्चिम महाराष्ट्र ते मराठवाडा जोडणारा बारामती ते उजनी जलाशय मार्गे परांडा महामार्ग तयार करण्यात यावा; अशी मागणी करमाळा तालुका परिसरातून करण्यात येत आहे.

बारामती ते परांडा महामार्ग झाल्यास संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग व सुरत-चेन्नई एक्सप्रेस मार्ग परांडा (जि.धाराशिव) जोडले जाणार आहेत. या मार्गामुळे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील अंतर ५० कि.मी.ने कमी होणार आहे. तसेच कुगाव येथील हनुमान भक्तांची गैरसोय दूर होणार असून आवाटी येथे येणाऱ्या मुस्लिम बांधवांची सोय होणार आहे. रूई येथील बाबीर देवस्थानला याचा फायदा होईल. तरकारी मालाला बाजारपेठ उपलब्ध होऊन ऊसासाठी पर्यायी कारखाने सुरू होतील. केळी निर्यातीसाठी सर्वात जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे. या प्रस्तावित महामार्गावर परांडे, आवाटी, जेऊर, शेटफळ, चिखलठाण, कुगाव (ता.करमाळा), कळाशी, लोणीदेवकर, रूई, कळस (ता.इंदापूर) आदी गावांचा समावेश आहे.


**R.K. & ASSOCIATES**
Pune Road, Rambhapuragalli, Karmala, Dist- Solapur

**मुले/मुली पाहिजेत**

**Job Description**
- Day to day accounts works
- Data entry
- Bank works
- Day book closing
- Collections work if any
- Tallying the payments & amount received
- Follow up with creditors
- And other related works

Job Type: Full time

**Contact : 9146941551, 9112319894**
Email- Ramvkale92@gmail.com










# विश्वासास पात्र राहून गावच्या विकासासाठी सर्वतोपरी मदत करू

## माजी आमदार नारायण पाटील यांचे आश्वासन



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण गावच्या विकासासाठी सर्व मतभेद बाजुला ठेवून गावपातळीवर कार्यकर्त्यांनी केलेल्या युतीस ग्रामस्थांनी भरभरून पाठींबा दिला असून, विरोधी पॅनलचा दारूण पराभव केला आहे. जेवढ्या विश्वासाने नागरीकांनी आम्हांस सहकार्य केले आहे. तेवढ्याच विश्वासाने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्वतोपरी मदत करू; असे आश्वासन पाटील गटाचे नेते व माजी आमदार नारायण(आबा) पाटील यांनी दिले आहे.


चिखलठाण ग्रामपंचायत निवडणुकीत बागल-पाटील युतीचा विजय झाला असून, विजयी झालेल्या नूतन सरपंच धनश्री विकास गलांडे, उपसरपंच राजाबाई शिवाजी मारकड, सदस्य हेमंत बारकुंड, ठकूबाई चव्हाण, योगेश सरडे, संभाजी कांबळे, आनंद पोळ, मनिषा जाडकर, अक्षय सरडे, सुमन गव्हाणे, गोजरबाई सरडे या नूतन सदस्यांचा सत्कार समारंभ व युवक नेते पै.विरेंद्रप्रताप विकास गलांडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून श्री.पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेटफळ येथील ह.भ.प.विठ्ठल पाटील महाराज हे होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, माजी अर्थ व बांधकाम सभापती विजयराज डोंगरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, आदिनाथचे माजी संचालक केरू गव्हाणे, धुळाभाऊ कोकरे, चिखलठाण सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे, माजी चेअरमन महादेव कामटे, राजुरीचे आबासाहेब टापरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री.पाटील म्हणाले, की चिखलठाण ग्रामपंचायत निवडणुकीत मतदारांना दिलेली आश्वासने सरपंच व सदस्य पूर्ण करतील. ती पूर्ण करण्यासाठी आम्ही त्यांना वरीष्ठ पातळीवरून मदत करू. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व जिल्हा नियोजन मंडळ या माध्यमातून गावासाठी भरपूर निधी उपलब्ध करून देऊ. याशिवाय श्री कोटलिंग मंदिरासाठीभाविकांना सुखसुविधा उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. विकास-कामात कोणताही दुजाभाव न करता व राजकारण न आणता आम्ही गलांडे यांना मदत करू; असेही आश्वासन पाटील यांनी दिले.


यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांनी सर्व मतदारांचे आभार व्यक्त करून दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी सरपंच धनश्री गलांडे यांना मदत करू. निवडणुकीत आम्ही रस्ते, वीज, पाणी, गटार, स्वच्छता मोहिम याबरोबरच क्रिडा संकुल, कोल्डस्टोअरेज, आधुनिक अभ्यासिका आदी दिलेली आश्वासन पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती विजयराज डोंगरे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख पुरूषोत्तम बरडे, माजी सभापती अतुल पाटील यांची शुभेच्छापर भाषणे झाली. या कार्यक्रमास कुगावचे सरपंच सागर पोरे, उपसरपंच दादासाहेब डोंगरे, सोगावचे सरपंच विनोद सरडे, केडगावचे माजी सरपंच डॉ.शहाजी कानगुडे, कुगावचे माजी उपसरपंच इन्नुस सय्यद तसेच संजीवन बोराडे, मच्छिंद्र सरडे, साहेबराव मारकड, शिवाजी मारकड, सर्जेराव मारकड, समाधान गव्हाणे, पप्पू गव्हाणे, संजय गव्हाणे, बिभिषण गव्हाणे, फिरोज तांबोळी, दिलीप दुबळे, अर्जुन टिंगळे, रंगनाथ रोकडे, रंगनाथ पवार, भारत पवार, जयराम गुंजाळ, दत्तात्रय बारकुंड, श्रीनाथ गव्हाणे, नवनाथ सरडे, प्रथमेश उंबरे, विठ्ठल सरडे, आबा मारकड, जगन्नाथ गलांडे उपस्थित होते. सुत्रसंचालन पप्पू गव्हाणे यांनी केले. आभार हेमंत बारकुंड यांनी मानले.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)



आता आपल्या करमाळ्यात !

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

ऑपरेशन ठिकाण
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# पै.अनिल जाधव यांनी पटकावला महाराष्ट्र चॅम्पियन किताब



करमाळा(सं.प्र.) : भैरवनाथ शुगरच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या भैरवनाथ शिवशक्ती क्रिडा संकुलातील पै.अनिल जाधव याने नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या माती राज्य विभागात महाराष्ट्र चॅम्पियनशीप चा किताब पटकावला आहे. या यशाबद्दल पै.अनिल जाधव यांचा कारखान्याचे कार्यकारी संचालक किरण सावंत यांनी सत्कार करून त्यांना बक्षीस दिले. यावेळी वस्ताद रामभाऊ गायकवाड, वजीर तांबोळी, राम गोसावी, गौरव गुटाळ, योगेश भिसे, ज्ञानेश्वर निमगिरे आदी पैलवान उपस्थित होते. भैरवनाथ शुगरच्या वतीने अत्याधुनिक व्यायाम शाळा कारखाना स्थळावर उभारण्यात आली आहे. या व्यायामशाळेत जवळपास निवासी ५० पैलवान कुस्तीचे धडे घेत आहेत. या क्रिडा संकुलातील अनेक पैलवानांनी कुस्त्यांचे फड गाजवलेले आहेत. यावेळी बोलताना किरण सावंत म्हणाले, की महाराष्ट्राची कुस्तीची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे काम भैरवनाथ शगुरच्या वतीने सुरू असून या अत्याधुनिक व्यायाम शाळेच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो पैलवान तयार झालेले आहेत. आज अनिल जाधव यांनी महाराष्ट्र चॅम्पियन हा किताब मिळवून भैरवनाथ शुगरच्या शिवशक्ती व्यायाम शाळेचे नाव मोठे केले आहे.

# राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण मंचच्या राज्य सरचिटणीस पदी प्रा.गोवर्धन चवरे



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ग्राहक संरक्षण मंचच्या महाराष्ट्र राज्य सरचिटणीपदी करमाळा येथील प्रा.ॲड.गोवर्धन चवरे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री सुर्यकांत गवळी, जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या शिफारशीने ही निवड करून त्यांना प्रदेश कार्यालयात नियुक्तीपत्र देण्यात आले. प्रा.चवरे हे राष्ट्रवादीचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्याचबरोबर त्यांच्यातील धडाडी व वक्तृत्व पाहून आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे स्वागत सर्व स्तरातून होत आहे.



गीर गाईचे प्युअर दुध मिळेल.
मो.9822058106

प्रवेश! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश!!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५


॥ राम कृष्ण हरी ॥
॥ राम कृष्ण हरी ॥
सा रे ग म प
म्युझीक अकॅडमी क्लासेस
ध नी सां
गुरुवर्य आशिर्वाद ह.भ.प.
श्री.सतीश सुर्यवंशी
श्री.केशव जगदाळे
श्री.तुकाराम गोसावी
आमच्याकडे गायन, हार्मोनियम, तबला, पखवाज तसेच वारकरी, संप्रदाय अभंग, गोळणी, भावगीत,भक्तीगीत, नाट्यगीत, ताल व स्वरबध्द नोटेशनसह शिकवले जातील. इच्छुकांनी अवश्य लाभ घ्यावा !
आमचे मार्गदर्शक
संगीत शिक्षक/भजन गायक
शुभारंभ
दि.३/१२/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
श्री.हनुमंत भांडवलकर (मो.९४२१५५४०८८)
क्लासची वेळ
रविवार, गुरुवार सकाळी ९ ते सायं.५
ह.भ.प.सचिन गटकुळ (मो.८०१०७१३११०)
स्थळ : जामखेड चौक, नगर-टेंभूर्णी रोड, करमाळा.
संपर्क
न्यु विशाल बॅटरी
जामखेड रोड करमाळा.
प्रोप्रा : तीर्थराज हनुमंत भांडवलकर
(७४९८९२३७९८/८०८०६५७५२९)


एस.एस.के.एस. असोसिएट्स्
अकौंट मॅनेजर पाहिजेत
सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)
पदासाठी अटी खालीलप्रमाणे..
कामाची वेळ : सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
पात्रता : कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे)
संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
पगार : ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.
संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)
पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.
टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.


आमचे मित्र श्री.संतोष आडाणे यांचे वडील
कै.रंगनाथ दत्तात्रय आडाणे
यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच
कै.दत्तात्रय रंगनाथ अडाणे
भावपूर्ण श्रध्दांजली
शोकाकुल
हॉटेल मातोश्री नगररोड, करमाळा. (प्रोप्रा : लावंड बंधू)


आशिर्वाद
आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक व करमाळा बार असोसिएशनचे अध्यक्ष
ॲड.दत्तात्रय महादेव सोनवणे
आपणांस दि.४ डिसेंबर रोजी असलेल्या..
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
सरपंच
उपसरपंच
प्रा.डॉ.सौ.विजया दत्तात्रय सोनवणे
सौ.मनिषा धनंजय गायकवाड
संचालक, मकाई कारखाना
अध्यक्ष, शा.व्य.समिती पांगरे
श्री.सचिन अरूण पिसाळ
श्री.ज्योतीराम अशोक गाडे-पाटील
शुभेच्छुक
ग्रामपंचायत, पांगरे (सर्व सदस्य व ग्रामस्थ)
श्रीराम तरूण मंडळ, पांगरे
श्रीराम स्वयंसहाय्यता बचत गट, पांगरे ता.करमाळा.

## बँक ऑफ इंडिया शाखा साडे मार्फत
# निंभोरे येथे महिला स्वयंसहाय्यता समुहांना बँक कर्ज वितरण



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत निंभोरे येथे बँक ऑफ इंडिया शाखा साडे मार्फत महिला स्वयंसहाय्यता समुहांना बँक कर्ज वितरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच रविंद्र वळेकर हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक श्री.जाधव, मार्गदर्शक म्हणून तालुका अभियान व्यवस्थापक योगेश जगताप उपस्थित होते. यावेळी श्री.जगताप यांनी उपस्थित महिलांना बँक कर्ज परतफेड, व्याज अनुदान योजना, विमा योजना, व्यवसाय निर्मिती, विविध प्रकारचे निधी, PMFME योजना बाबत सखोल मार्गदर्शन केले. शाखा व्यवस्थापक श्री.जाधव यांनी महिलांनी व्यवस्थित कर्ज परतफेड करावी तसेच कर्जाचा वापर योग्य कारणासाठी करावा; असे सांगितले. शाखे मार्फत चार समुहांना ३२.५६ लाख रुपये मान्यवरांचे हस्ते वाटप करण्यात आले. एप्रिल २०२३ पासून निंभोरे गावात ९२ लाख रु. कर्ज वाटप करण्यात आले आहे. कौशल्य समन्वयक प्रशांत मस्तुद यांनी DDUGKY मार्फत दिले जाणारे विविध प्रकारचे प्रशिक्षण बाबत माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिलीप मुळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राणी लक्ष्मी व जिजाऊ महिला ग्रामसंघाचे पदाधिकारी, लिपिका सीआरपी मंजुश्री मुळे, सुषमा वाघमारे, बँक सखी अनिता चव्हाण, FLCRP योगिता जानभरे व व्यवस्थापक श्री.पवार यांनी सहकार्य केले.

# भाजपा व्यापारी अघाडीचे अध्यक्ष जितेश कटारिया यांचा वाढदिवस साजरा







करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीचे शहराध्यक्ष जितेश कटारिया यांचा वाढदिवस अनावश्यक खर्चाला फाटा देत साध्या पध्दतीने व सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त श्री.कटारिया यांचा भाजपा कार्यालयात गणेश चिवटे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रामा ढाणे, अमोल पवार यांचेसह भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, भाजपाचे नरेंद्रसिंह ठाकूर, शाम सिंधी, महेश परदेशी, विठ्ठल क्षीरसागर तसेच डॉ.निलेश मोटे, लावंड सर, कांबळे सर महेश परदेशी, खंडू चांदगुडे आदींनी प्रत्यक्ष भेटून श्री.कटारियांचा सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच नंदन प्रतिष्ठानच्या वतीनेही श्री.कटारियांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.



डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

## सन १९८६ च्या दहावी बॅचचा मेळावा – ७० जणांचा सहभाग
# महात्मा गांधी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा



करमाळा(सं.प्र.) : येथील महात्मा गांधी विद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात सन १९८६ च्या दहावी बॅचचे तब्बल ७० विद्यार्थी उपस्थित होते. जुने मित्र-मैत्रिणी त्यांच्या सोबत शिकत असताना घडलेले गंमतीशीर किस्से, शिक्षण घेत असताना काढलेल्या खोड्या अशा साऱ्या आठवणींना उजाळा देत सर्वांनी हा स्नेहमेळावा साजरा केला. सोलापूर, नगर, पुणे, मुंबई, लातूर, सातारा अशा अनेक जिल्ह्यातून आपल्या जुन्या मित्रांना भेटण्यासाठी माजी विद्यार्थी एकत्र आले होते.

यावेळी १९८६ च्या बॅचचा महात्मा गांधी विद्यालयामध्ये माजी विद्यार्थ्यांचा वर्ग भरवण्यात आला. यावेळी माजी शिक्षक गोरे सर, के.बी.शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना काही जुन्या आठवणी सांगितल्या. माजी प्राचार्य आर.आर.मोरे यांनी विद्यार्थ्यांना घडवत असताना अनेकवेळा मी कठोर होत होतो. मात्र या पाठीमागचा हेतू खूप निर्मळ होता; अशा भावना व्यक्त केल्या. नंदकुमार शेंडगे यांनी कविता सादर केल्या. सुत्रसंचालन फोजमल पाखरे व भाऊसाहेब फुलारी यांनी केले. या कार्यक्रमास उपस्थित असलेले विद्यालयातील माजी शिक्षक नंदकुमार शेंडगे, सस्ते सर, विधाते सर, आर.व्ही.शिंदे सर, एस.पी.शिंदे सर, तात्यासाहेब मस्कर, गोरे सर, आर.आर. मोरे, जांभळे सर, मांडवकर सर यांचा माजी विद्यार्थ्यांनी सन्मान केला. तब्बल ३७ वर्षांनी एकत्र येणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आगळ्यावेगळ्या पध्दतीने व माजी शिक्षकांचा सन्मान करीत उत्साहात संपन्न झाला.

प्रोप्रा : संदीप चुंग (9860670816)
न्यु संगम हॉटेल & बेकर्स



मिठाई, नमकीन बरोबर आता
▪ वाढदिवसाचे केक
▪ सुट्टी खारी, टोस्ट, बटर, ब्रेड
▪ मस्का पाव व वाटी केक
मिळतील. एकवेळ अवश्य भेट द्या..!



पत्ता : पंजाब वस्ताद चौक, करमाळा.

मकाई कारखान्याचे ऊस बिल मिळण्यासाठी

# करमाळा तहसील कार्यालयावर बोंबाबोंब आंदोलन



करमाळा(सं.प्र.) : मकाई सहकारी साखर कारखान्याचे ऊस बिल तात्काळ मिळावे; या मागणीसाठी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांच्या नेतृत्वाखाली करमाळा तहसील कार्यालयावर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. मकाई कारखान्याचे ऊस बिल जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहणार असल्याचे प्रा.रामदास झोळ यांनी सांगितले.

गेल्या वर्षभरापासून मकाई कारखान्याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस बिल येणेबाकी आहे. गेल्या वर्षी उत्पादीत साखर, मोलॅसिस बगॅस चे पैसे कुठे गेले ? असा सवाल मकाईच्या चेअरमन व संचालक मंडळावर गुन्हे दाखल करून त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढवण्यात यावा; अशी मागणी आंदोलकांनी प्रशासनाकडे केली. यावेळी प्रा.झोळ, दशरथ कांबळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविंद्र गोडगे, अ‍ॅड.राहुल सावंत, माजी उपसरपंच शहाजी माने, शेतकरी संघटनेचे सुदर्शन शेळके, हरिभाऊ झिंजाडे, विठ्ठल शिंदे, प्रा.राजेश गायकवाड, माजी सरपंच भगवान डोंबाळे, हरिदास मोरे, अक्षय घुमरे, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मकाई कारखान्याने शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल तात्काळ न दिल्यास याहीपेक्षा अधिक तीव्र आंदोलन केले जाईल; असाही इशारा प्रा.झोळ यांनी दिला.



बोंबाबोंब आंदोलन चालू असताना तरटगाव येथील शेतकरी हरीदास मोरे यांचा संयमाचा बांध फुटला व त्यांनी अधिकाऱ्यांसमोर आपल्या अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, एपीआय जगदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या शेतकऱ्याला समजावून सांगत आत्मदहन करण्यापासून परावृत्त केले.

मोटारसायकलला पिकअपची पाठीमागून धडक

# करमाळा येथील काळे दाम्पत्यांचा दुर्दैवी मृत्यू



करमाळा(सं.प्र.) : शहरातील दगडीरोड येथील रहिवाशी असलेले मनोज काळे (वय-४८) व पुष्पा काळे (वय-४२) या दाम्पत्यांचा मोटारसायकल अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा प्रकार सायंकाळी सातच्या सुमारास सालसे गावाजवळ घडला आहे. मनोज काळे हे पत्नीसह माढा तालुक्यात पाहूण्यांकडे गेले होते. मोटारसायकलवर सायंकाळी परत घरी निघताना सालसे गावाजवळ असताना पाठीमागून पिकअप गाडीने मोटारसायकलला धडक दिली. धडक इतकी जोरात होती की पुष्पा काळे या उडून गाडीच्या बोनेटवर पडून खाली पडल्या व त्यांच्या अंगावरून गाडी जावून त्या जागीच मयत झाल्या तर मनोज काळे यांच्या डोक्याला व चेहऱ्याला जोराचा मार लागला. मनोज यास उपजिल्हा रूग्णालयात आणले असता, ते गंभीर जखमी असल्याने त्यांना बार्शी येथील खाजगी दवाखान्यात नेण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. पती-पत्नीचे एकाच वेळी निधन झाल्याने करमाळा शहरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. किल्लावेस येथील हनुमान मंदिराचे ते पुजारी म्हणून काम पाहत होते. त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी व सुन असा परिवार आहे.

अपघातातील पिकअप चालकास पोलीसांनी ताब्यात घेतले असून सोमवारी रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. काळे दांम्पत्याच्या निधनाचे वृत्त समजताच उपजिल्हा रूग्णालयासमोर आप्तेष्टांनी मोठी गर्दी केली. रात्री उशीरा शवविच्छेदन झाल्यानंतर रूग्णालयातून दोन्ही मृतदेह ताब्यात घेण्यास नकार देत नातेवाईकांनी नुकसान भरपाई मिळाल्या-शिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतला होता. या प्रकरणी शहरातील महेश चिवटे, संजय सावंत, सुनील सावंत, अरूण जगताप यांनी नातेवाईक व पोलीस यांच्यात समन्वय घडवून आणत याबाबतचा तणाव आटोक्यात आणल्यानंतर मंगळवारी दुपारी मृतांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी**
**२०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा**





लोकनियुक्त सरपंच
लोकनेते
चेअरमन, चिखलठाण सोसायटी
मा.आमदार
उपसरपंच
श्री.विकास गलांडे
चिखलठाण ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच पदी
बागल-पाटील युतीच्या
सौ.धनश्री विकास गलांडे
व उपसरपंच पदी
सौ.राजाबाई शिवाजी मारकड
यांची निवड झाल्याबद्दल तसेच
नूतन ग्रामपंचायत सदस्यांचे
हार्दिक अभिनंदन !
सदस्य - हेमंत बारकुंड, योगेश सरडे, संभाजी कांबळे, आनंद पोळ, अक्षय सरडे,
ठकूबाई राजेंद्र चव्हाण, मनिषा जाडकर, सुमन मनोहर गव्हाणे, गोजरबाई पांडूरंग सरडे
शुभेच्छुक
चिखलठाण वि.का.सेवा सह.संस्था मर्या; चिखलठाण
चेअरमन - विकास गलांडे, सचिव - सतीश बनसोडे , सर्व संचालक व सभासद




युवा नेते
देशभक्त
मा.उपनगराध्यक्ष
मा.नगराध्यक्ष
माजी आमदार
भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन व जगताप गटाचे युवा नेते
मा.श्री.शंभुराजे जगताप
यांना २ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
महात्मा गांधी ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, करमाळा.
श्री.पी.ए.कापले (प्राचार्य)
श्री.ए.एच.बागवान (उप-प्राचार्य)
सौ.सुनिता नवले (पर्यवेक्षिका)
श्री.बी.के.पाटील (पर्यवेक्षक)
प्रा.व्ही.एल.पवार (विभागप्रमुख)
प्रा.यु.डी.पाटोळे, प्रा.एस.बी.कन्हेरे, प्रा.पी.ई.सागडे, प्रा.एम.पी.झालटे
प्रा.सौ.एस.ए.बुद्रूक, प्रा.डी.बी.भागडे, प्रा.एस.एन.नलवडे, प्रा.जे.एन.चौरे, प्रा.एम.पी.थोरात, प्रा.पी.जे.जाधव
प्रा.बी.एस.इबितदार, प्रा.एच.ए.निंबाळकर, प्रा.डी.पी.लावंड, प्रा.संग्राम दयाळ, प्रा.एस.बी.जाधव
प्रा.के.जी.कुसकर, प्रा.एम.डी.पाटोळे, सौ.एस.बी.घळके, प्रा.डी.के.दळवे, एम.बी.चोरगे (प्रयोगशाळा परिचारक)

# समाजसेवा आणि व्यवसाय याचा समन्वय साधणारे व्यक्तीमत्व - ॲड.वीर

माझे मुळ गाव तुळजापूर (जि.उस्मानाबाद) हे आहे. माझे वडील अशोक शिवाजीराव इंगळे यांना शिक्षणाची आणि चांगल्या माणसाची आवड आहे. यातून त्यांनी मला बी.ए. पर्यंतचे शिक्षण शिकवले. तुळजापूरला करमाळा येथील कमलाभवानीचे विश्वस्त स्व.विश्वनाथ वीर (तात्या) हे कायम येत असत. तात्यांची कमलाभवानी आणि तुळजाभवानी या देवीवर नितांत श्रध्दा होती. त्यातून ते तुळजापूरला येत असताना माझ्या वडीलांची व त्यांची भेट होत असे. त्यातूनच ॲड.कमलाकर यांचे स्थळ सांगून आले आणि माझ्या वडीलांनी क्षणाचाही विलंब न करता होकार दिला. त्यानंतर दि.२३ एप्रिल १९९५ रोजी आमचा विवाह झाला. खरंतर लग्नापूर्वी आजच्या काळाप्रमाणे मोबाईलवर गप्पा, चॅटींग अथवा भेटीगाठी असे काहीच नव्हते. आई-वडीलांच्या सूचनेवरून लग्नं केलं आणि वीर परिवारात आल्यानंतर मला सासर हा शब्द कधीच आठवला नाही. उलट गोकुळात आल्यासारखं वाटलं.

घरात तात्या, आक्का (सासुबाई), नणंद (मंगलताई) याबरोबर थोरल्या भावासारखे दीर स्व.आबासाहेब (नानासाहेब), छोट्या भावासारखे रमेशभाऊ व अरूणकाका असा आमचा परिवार होता. घरातील कामं आम्ही महिला सर्व मिळून करत असत. तर पुरूष मंडळी सकाळपासून आपापल्या कामात व्यस्त असत. विशेष म्हणजे सर्वांचीच एक सवय म्हणजे दिवसा जेवण हा विषय नव्हताच. थोडासा नाष्टा आणि संध्याकाळी जेवण. तात्यांचं देवपुजेवरती विशेषत: देवीवरती खूप श्रध्दा होती. देवीच्या दर्शनाशिवाय त्यांनी कधीही चहा, नाष्टाच काय पण पाणी सुध्दा घेतले नाही. आक्का आम्हा सर्वांना अतिशय आनंदानं समाजवून घेऊन लेकीची माया लावत होत्या. खरंतर फार मोठं सुख होतं, पण काळाच्या ओघात तात्या, आक्का आणि अलिकडे थोरले दीर नानासाहेब आमच्यातून गेले, त्यांच्या आशिर्वादाने आम्हाला सर्व आहे पण ते नाहीत याचे दु:ख आहे. व्यवसायाच्या निमित्ताने आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी रहात असलोतरी आम्हा सर्वांमध्ये अंतरीचा जिव्हाळा कायम आहे. आमचे चारही परिवार सण, विशेष समारंभ याला एकत्र येतात. हा सर्व गोतावळा एका धाग्यात बांधण्यासाठी माझे पती ॲड.कमलाकर वीर यांचा मोठा वाटा आहे. आमच्या लग्नानंतर माझ्या पतीचा असलेला मित्र परिवार मला पाहण्यात आला आहे. त्यांचा मोठा मित्र परिवार असून ते कायम मित्र परिवारात, सुख-दु:खात सहभागी असतात. गणेशोत्सव, मोहरम, कमलादेवीची यात्रा, नवरात्रोत्सव याचबरोबर शहरातील छोट्या-मोठ्या उत्सवात त्यांचा सहभाग असतो. राजकारणातही ते कायम असतात. पण विरोधकांशीही त्यांचे तेवढेच विश्वासाचे व प्रेमाचे संबंध आहेत. ही जादू ॲड.वीर यांच्यासारखी इतरांना चालवता येणार नाही.

सन २००१ ला ते करमाळा नगरीचे नगरसेवक म्हणून निवडले, उपनगराध्यक्षही झाले. त्यांच्या कामाची खात्री पटल्याने पुढे त्यांना सन २००९ व २०१२ ला सत्ताधारी गटाने स्वीकृत नगरसेवक म्हणून घेऊन सन २०१६ पर्यंत सेवा करण्याची संधी दिली. राजकारण, समाजकारण, मित्र परिवार आणि आपला मोठा परिवार सांभाळूनही ते व्यवसायावर संपूर्ण लक्ष केंद्रीत करतात; हे त्यांचे वेगळेपण आहे. अनेक गावचे, वेगवेगळ्या अडचणीचे पक्षकार येतात. कधी तात्याचं नाव सांगून तर कधी आबाचं नाव सांगून काम घेऊन काही गरजू लोक येतात. अशांचं काम ते करतातच पण अशा गरजू लोकांना ते कधीही पैशाचा विषय काढत नाहीत. हा एक त्यांच्यातील वेगळा पैलु आहे.



## नवरा माझा...

आम्हाला अक्षय व अजिंक्य ही दोन मुले आहेत. विशेष म्हणजे या दोघांनीही वडीलांचा वारसा चालविण्याचे ठरवले. अक्षय एलएल.बी नंतर करमाळा येथे प्रॅक्टीस करत आहे. अजिंक्य हा एलएलबी नंतर पुणे येथे प्रॅक्टीस करत आहे. माझ्या वाटचालीत पतीची पूर्ण साथ असल्याने मुलांना परिपूर्ण बनविण्याची संधी मिळाली. पुढील काळात पती व मुलांच्या सहकार्याने महिलांसाठी विशेष काहीतरी काम करण्याची इच्छा असून ते लवकरच अंमलात आणेल; असा माझा संकल्प आहे.

**...सौ.स्वाती कमलाकर वीर**
**मो.९४०४३०००४९**

### तीन ठिकाणांची तज्ञांकडून पाहणी

# उजनीतून लवकरच विमानसेवा सुरू होणार

करमाळा(सं.प्र.) : हनुमान जन्मभुमी कुगाव, पंढरपूर, इंदापूर, पुणे हा प्रवास स्वस्तात आणि जलद व्हावा म्हणनू उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पुणे जि.प.च्या माध्यमातून धरणातील तीन ठिकाणांची पाहणी तज्ञांकडून करण्यात आली आहे. त्यातील दोन ठिकाणे तांत्रिकदृष्ट्या अडचणींची ठरणार आहेत. त्यामुळे इंदापूर जवळील कालठण हे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. तसा अहवालही नागरी हवाई उड्डाण मंत्रालयास पाठविण्यात आला आहे. खा.सुप्रिया सुळे यांच्या मागणीनुसार उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्या पार्श्वभुमीवर धरणाच्या दरवाजाजवळ एक ठिकाण विमानसेवेसाठी उत्तम आहे. मात्र धरणाच्या सुरक्षिततेच्या कारणावरून धरणाजवळ परवानगी देता येणार नाही; असे उजनी जलाशय व्यवस्थापन विभागाने स्पष्ट केले. तर कुंभारगाव परिसरातील ठिकाणी परदेशातून विविध पक्षी येतात आणि त्या ठिकाणी पक्षीनिरीक्षण केंद्र आहे. त्यामुळे त्या ठिकाणालाही मान्यता देता येत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आता कालठणची जागा निश्चित करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खासगी टेक्नीकल एक्सपर्ट यांनी त्या ठिकाणांची पाहणी केली आहे. आता नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाकडून त्यांच्या अहवालाचा अभ्यास करून त्यांच्याकडून पुन्हा स्वतंत्रपणे पाहणी केली जाणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल; असेही सांगण्यात आले. तत्पूर्वी त्याला उजनी जलाशय (जलसंपदा) आणि पर्यावरण विभाग व एअर ट्राफिक कंट्रोल विभागाची मान्यता घ्यावी लागणार आहे.




### ना हरकत प्रमाणपत्र देऊ

उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खासगी तांत्रिक तज्ञांकडून पाहणी झाली. त्यांनी तीन ठिकाणांची पाहरी केली असून त्यापैकी इंदापूर जवळील कालठण हे ठिकाण सोयीचे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी आमच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

**..रावसाहेब मोरे (कार्यकारी अभियंता, उजनी)**

हनुमान जन्मभुमी कुगावला उजनी बॅकवॉटर परिसरातील भीमा नदीच्या पाण्याने तीनही बाजूने वेढा घातला आहे. आता जल हवाई वाहतूक सेवा सुरू झाल्यावर या परिसरातील अर्थव्यवस्थेला पर्यटनाच्या माध्यमातून प्रचंड चालना मिळणार आहे; असे मत कुगावच्या माजी सरपंच तेजस्विनी कोकरे यांनी व्यक्त केले.



लोकनियुक्त सरपंच



लोकनेते



चेअरमन, चिखलठाण सोसायटी



श्री.विकास गलांडे

मा.आमदार



उपसरपंच



चिखलठाण ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच पदी
बागल-पाटील युतीच्या

**सौ.धनश्री विकास गलांडे**

व उपसरपंच पदी

**सौ.राजाबाई शिवाजी मारकड**

यांची निवड झाल्याबद्दल तसेच
नूतन ग्रामपंचायत सदस्यांचे

## हार्दिक अभिनंदन !

**सदस्य** - हेमंत बारकुंड, योगेश सरडे, संभाजी कांबळे, आनंद पोळ, अक्षय सरडे, ठकूबाई राजेंद्र चव्हाण, मनिषा जाडकर, सुमन मनोहर गव्हाणे, गोजरबाई पांडूरंग सरडे

शुभेच्छुक **ग्रामपंचायत चिखलठाण, ता.करमाळा.**

---

पुणे येथील सुप्रसिध्द पोटविकार तज्ञ

# डॉ.अभिजीत लक्ष्मण नीळ

(M.S.FMAS) (Endoscopist - Laproscopist)

**प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी**


## करमाळ्यात उपलब्ध !

17 / 12 / 2023

नांवनोंदणी आवश्यक

पोटविकाराच्या रूग्णांना उपचारासाठी
आता परजिल्ह्यात जायची गरज नाही..,
आता पोटविकार तज्ञ करमाळ्यातच उपलब्ध !

**पोटविकारांच्या सर्व समस्यांवर निदान व अल्पदरात उपचार**



**उपलब्ध सुविधा...**

- अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे निदान व शस्त्रक्रिया (General surgery) लॅप्रोस्कोपी व एन्डोस्कोपी
- कर्करोग (कॅन्सर) उपचार व शस्त्रक्रिया (Onco surgery)
- मूत्रविकार उपचार (Uro surgery)
- अपघात विभाग, सांधेबदल शस्त्रक्रिया (Ortho pedic surgery)
- मेंदू/मणका विकार उपचार शस्त्रक्रिया (Nuro surgery)
- स्त्रीरोग व प्रसुतितज्ञ विभाग (Gynaec surgery)
- मुळव्याध/भगंदर-फिशियर उपचार व शस्त्रक्रिया (Piles surgery)

## एन्डोस्कोपी

माफक दरात उपलब्ध

(एन्डोस्कोपीसाठी उपाशीपोटी यावे)



पत्ता

## शिवश्री क्लिनिक

सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.(9860982072)

संपर्क...

मो.8291174004
मो.9860982072
मो.9096613132

- स्पर्श हॉस्पिटल रहाटणी, पुणे.
- स्पर्श हॉस्पिटल काळेवाडी, पुणे
- अमृते/स्पर्श हॉस्पिटल चिंचवड(पुणे)